(223)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर

**P.S.(ठाणे):** संगमनेर शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0318

**Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/04/2023 04:13

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 , 7(A) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 21/04/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/04/2023

**Time From (वेळेपासून):** 17:35 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/04/2023

**Time (वेळ):** 03:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/04/2023 03:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बस स्थानका जवळील शॉपिंग,सेन्टर मधील गाळा नं 111

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** संगमनेर शहर

**District(State) (जिल्हा(राज्य)):** अहमदनगर(महाराष्ट्र)



CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रमेश रंगनाथ पवार

(b) **Father's/Husband's Name (वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | [illegible], पोंधा वस्ती, रा ,मंगळापुर, ता संगमनेर,संगमनेर शहर ,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | [illegible], पोंधा वस्ती, रा ,मंगळापुर, ता संगमनेर,संगमनेर शहर ,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपींचे संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | धनराज नुरसिंग राठोड | | | 1. राह शेळके हस्पिटलच्या बाजुला, इंदिरानगर गल्ली नं 2, संगमने, संगमनेर शहर ,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | योगेश विठ्ठल काशिद | | | 1. घुलेवाडी, ता संगमनेर, ,संगमनेर शहर ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची मागणी केलीली रोख रक्कम | 36,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

36,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद संगमनेर शहर पोलीस स्टेशन,जि. अहमदनगर दि. 22/04/2023

माझे नाव रमेश रंगनाथ पवार, वय - 30 वर्षे, व्यवसाय - मार्केटींग, पोंधा वस्ती, रा. मंगळापुर, ता. संगमनेर जि. अहमदनगर. मोबा. नं. 7507240846.

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहून फिर्याद देतो की, मी वर नमुद पत्त्यावर कुटंबीयांसह राहण्यास असुन मी व्होकार्ट मेडीसिन कंपनीमध्ये मेडीकल रिप्रेझेंटेटीव्ह म्हणुन संगमनेर तालुक्यात काम पाहतो. दिनांक 21/04/2023 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथील कार्यालयात फोन करून एक लोकसेवक माझ्याकडे लाचेची मागणी करीत असलेबाबत सांगितले. त्यानंतर काही वेळातच मला श्रीमती गायत्री जाधव, ला. प्र. वि. नाशिक यांनी मला संपर्क साधला त्यावेळी मी त्यांना संगमनेर तालुक्यातील वेल्हाळे येथील श्रीहरीबाबा मंदीराजवळ पुढील कार्यवाहीकरीता येण्यास सांगितले. त्यावेळी पोनि/श्रीमती गायत्री जाधव यांनी त्यांचे शासकीय वाहनाचे वर्णन व क्रमांक मला सांगितला. त्यानंतर दुपारी 14/00 वाजेचे सुमारास बोलेरो गाडी क्र. एम.एच.15 ईए. 0146 हि श्रीहरीबाबा मंदीराजवळ आली. मी सदर वाहनाजवळ गेलो त्यावेळी सदर वाहनामध्ये बसलेल्या महिलेने मला आपण तक्रारदार रमेश पवार आहात का? असे विचारले, त्यावेळी मी होय म्हणुन सांगितल्यानंतर पोनि/श्रीमती गायत्री जाधव यांनी स्वतःचा तसेच पंच श्री. केतन चौधरी व श्री. विशाल गरूड तसेच सापळा पथकातील पोहवा/गोसावी, पोना/गरूड, चालक पोहवा/पवार यांचा परिचय करून देवुन माझा परिचय करून घेतला.

त्यानंतर पोनि/श्रीमती गायत्री जाधव यांनी पंचांना माझी काय तक्रार आहे हे विचारण्यास सांगितले, त्यावरून मी माझी तक्रार तोंडी सागुन स्वहस्ताक्षरात लिहुन दिली, ती पुढील प्रमाणे - ''मी व्होकार्ट मेडीसिन कंपनीमध्ये मेडीकल रिप्रेझेंटेटीव्ह म्हणुन संगमनेर तालुक्यात काम पाहतो. माझे वडील श्री. रंगनाथ गवाजी पवार व इतर 11 अशांनी मिळुन मंगळापुर येथे एकुण 43 गुंठे बिगरशेती क्षेत्र विकत घेतलेले आहे. सदर क्षेत्राचा स्वतंत्र 7/12 उतारा तयार करण्यासाठी चिखली येथील तलाठी कार्यालयातील तलाठी श्री. धनराज राठोड यांच्याकडे अर्ज व आवश्यक ते कागदपत्र दिलेले आहेत. मी दिनांक 20/04/2023 रोजी चिखली गावात जावुन तलाठी श्री. धनराज राठोड यांची भेट घेवुन माझे वडील व इतर 11 यांनी मिळुन मंगळापुर येथे घेतलेल्या क्षेत्राचा स्वतंत्र 7/12 उतारा तयार करून देणेबाबत विनंती केली असता त्यांनी मला सांगितले की, तुझ्या वडीलांच्या नावे 13 गुंठे क्षेत्र येत असुन तु मला 48000/- रू. दे मी एक दिवसात तुमचा स्वतंत्र 7/12 तयार करून देतो असे म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी केली, तसेच उदया मला संगमनेर बस स्थानकाजवळील गाळा नं. 111 मधील सहयाद्री कन्सल्टींग अँण्ड मल्टीसर्व्हीसेस येथे भेटण्यासाठी ये असे सांगितले आहे. मला श्री. धनराज राठोड, तलाठी, सजा - चिखली, ता. संगमनेर, जि. अहमदनगर यांना लाच देण्याची ईच्छा नसुन त्यांच्यात व माझ्यात कोणताही आर्थिक व्यवहार किंवा उसनवारी नाही तसेच भांडणतंटा अथवा वैर नाही. तरी तलाठी श्री. धनराज राठोड यांचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.'' अशी तक्रार लिहुन देवुन त्यावर मी सही केल्यानंतर सदर तक्रारीवर पोनि/श्रीमती गायत्री जाधव व पंचांनी सहया केलेल्या आहेत.

मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे संगमनेर तालुक्यातील चिखली येथील तलाठी श्री. धनराज राठोड हे खरोखरच माझ्याकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याकरीता मला व पंच श्री. केतन चौधरी यांना संगमनेर बस स्थानकाजवळील गाळा नं. 111 मधील सहयाद्री कन्सल्टींग अँण्ड मल्टीसर्व्हीसेस शॉप मध्ये पाठविणे



CamScanner

असल्याने त्याअनुशंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि/श्रीमती गायत्री जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मी परिधान केलेल्या शर्टच्या खिशामध्ये ठेवुन मला व पंच श्री. केतन चौधरी अशांना माझेकडील दुचाकी वाहन क्र. एम-एच-17-सीएस-2263 ने संगमनेर बस स्थानकाजवळील गाळा नं. 111 मधील सहयाद्री कन्सल्टींग अँण्ड मल्टीसर्व्हीसेस शॉप मध्ये जाण्यासाठी रवाना केले. ती वेळ 14/59 वाजेची होती.

त्यानंतर मी व पंच श्री. केतन चौधरी असे माझेकडील दुचाकी वाहनाने संगमनेर बस स्थानकाजवळील शॉपिंग सेंटर जवळ पोहचल्यानंतर गाळा नं. 111 मधील सहयाद्री कन्सल्टींग अँण्ड मल्टीसर्व्हीसेस शॉप मध्ये गेलो. सदर ठिकाणी तलाठी श्री. धनराज राठोड हे दिसुन न आल्याने मी त्यांना त्यांचे मोबाईलवर कॉल केला त्यावेळी त्यांनी मी थोडया वेळात येतो असे सांगितले. त्यानंतर काही वेळात तलाठी श्री. धनराज राठोड हे तेथे आल्यानंतर मी पंच श्री. केतन चौधरी यांच्या उपस्थितीत तलाठी श्री. धनराज राठोड यांची भेट घेवुन कामासंबंधी चर्चा केली. त्यावेळी तलाठी श्री. धनराज राठोड यांनी माझे वडील श्री. रंगनाथ पवार व इतर 11 यांनी मंगळापुर येथे खरेदी केलेल्या बिगरशेती क्षेत्राचा स्वतंत्र 7/12 उतारा तयार करून देण्याच्या मोबदल्यात 45,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 36,000/- रूपये लाचेची मागणी केल्याची व तलाठी श्री. धनराज राठोड यांनी 36,000/- रूपये लाचेची रक्कम सहयाद्री कन्सल्टींग अँण्ड मल्टीसर्व्हीसेस नावाचे शॉप मध्ये काम करणा-या योगेश नावाच्या मुलाकडे देण्यास सांगितले. त्यानंतर मी पोनि/श्रीमती गायत्री जाधव व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो ती वेळ 15/40 वाजेची होती.

पंच श्री. केतन चौधरी, मी सांगितलेल्या हकीगतीवरून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकार्ड झालेल्या संभाषणावरून संगमनेर तालुक्यातील चिखली येथील तलाठी श्री. धनराज राठोड यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्याची पोनि/श्रीमती गायत्री जाधव व पंचांची खात्री झाली. पडताळणी कारवाई दरम्यान तलाठी श्री. धनराज राठोड यांनी लागलीच 36,000/-रू.घेवुन येवुन योगेश नावाच्या इसमाकडे देण्यास सांगितले असल्याने त्यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्यासाठी 36,000/-रुपये हजर करण्यास सांगितले असता मी 2000/- रू. दराची 01 व 500/- रुपये दराच्या 68 चलनी नोटा असे एकुण 36,000/- रुपये पंचासमक्ष हजर केले. त्यानंतर पोना/अजय गरूड यांनी शासकीय वाहनात काळा कपडयाचे साहाय्याने अंधार करून अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचे गुणधर्माबाबतचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पोना/अजय गरूड यांनी मी हजर केलेले 36,000 रुपये त्यात 2000/- रू. दराची 01 व 500/- रुपये दराच्या 68 चलनी नोटांना माझे व पंचासमक्ष अँन्थ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा मी परिधान केलेल्या पँटचे पुढील उजव्या बाजुच्या खिषात ठेवल्या. त्यानंतर पोनि/श्रीमती गायत्री जाधव यांनी मला, दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्यांना यशस्वी सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देवुन तलाठी श्री. धनराज राठोड अगर खाजगी इसम योगेश यापैकी कोणीही लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी माझ्या ''शर्टची उजवी बाही वर करावी'' असा लाचेची रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा सांगितला.

त्यानंतर पोनि/श्रीमती गायत्री जाधव यांनी त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन ते चालु करुन मी परिधान केलेल्या शर्टच्या खिशात ठेवुन मला, पंच श्री. केतन चौधरी यांचेसोबत माझेकडील दुचाकी वाहनाने तलाठी श्री. धनराज राठोड यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. ती वेळ 17/21 वाजेची होती. आमचे दुचाकीचे मागे पोनि/श्रीमती गायत्री जाधव, पंच श्री. विशाल गरुड व सापळा पथकातील सदस्य असे शासकीय वाहनाने आमचे मागोमाग येत होते. मी व पंच नं 1 केतन चौधरी असे संगमनेर बस स्थानकाजवळील शॉपिंग सेंटरचे पार्कीगमध्ये पोहचल्यानंतर खाली उतरून शॉपिंग सेन्टटरच्या जिन्याजवळ पोहचलो, त्यावेळी तलाठी श्री. धनराज राठोड यांची व आमची भेट झाली. त्यावेळी मी तलाठी श्री. धनराज राठोड यांना ''मी काय म्हणतो सर, छत्तीस आणले हे टोटल, छत्तीस हजार परत म्हणजे छत्तीस परत म्हणजे नंतर देणार नई का आता एवढे'' असे म्हणालो, त्यावर तलाठी श्री. धनराज राठोड हे ''नको देवु जावु दे आता'' असे म्हणाले, त्यावर मी मी '' नई नई '' असे म्हणालो, त्यावर तलाठी श्री. धनराज राठोड हे ''योगेश कडे देवुन टाक'' असे म्हणाले, त्यानंतर मी व पंच श्री. केतन चौधरी असे शॉपिंग सेंटरच्या पहिल्या मजल्यावरील गाळा नं. 111 मधील सहयाद्री कन्सल्टींग अँण्ड मल्टीसर्व्हीसेस नाव असलेल्या गाळयामध्ये गेलो. सदर ठिकाणी मी योगेश कडे गेलो व ''योगेश भाऊ'' असे बोललो, त्यावर योगेश याने ''आप्पासाठी आणलेय'' अशी विचारणा केली, त्यावर मी ''झाल बोलण, देवु का मग'' अशी विचारणा केली, त्यावर योगेश याने ''पॅक करून ठेवा'' असे म्हणुन माझ्याकडे एक कागद दिला, त्यावेळी मी पँटचे उजव्या बाजुच्या खिशातील अँन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम काढुन सदर कागदामध्ये गुंढाळुन स्टॅपलरची पिनने पॅक करून ''ठेवु का इथ'' अशी विचारणा केली, त्यावेळी योगेश याने सदर लाचेची रक्कम स्विकारून ती त्याचे टेबलच्या कप्प्यात ठेवुन '' असे काही नाही दररोज पेपर मधेच ठेवतो, आप्पा आले वर देवुन



CamScanner

टाकतो त्यांना डायरेक्ट'' असे सांगितले. त्यानंतर मी गाळ्याचे बाहेर येवुन लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजित इशारा केला. ती वेळ सुमारे 17/36 वाजेची होती. त्यावेळी पोनि/श्रीमती गायत्री जाधव, पंच श्री. विशाल गरूड, पोना/गरूड असे गाळ्यामध्ये जात असतांना आपण माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर पोनि/श्रीमती गायत्री जाधव यांनी पंच श्री. केतन चौधरी यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली व कोठे ठेवली अशी विचारणा केली त्यावेळी त्यांनी योगेशने लाचेची रक्कम स्विकारून ती टेबलच्या कप्प्यात ठेवली असल्याचे सांगितले. त्यानंतर काही वेळातच पोहवा/सचिन गोसावी हे तलाठी श्री. धनराज राठोड यांना घेवुन शॉपिंग सेंटरच्या गाळा नं. 111 मध्ये घेवुन आले. त्यानंतर पोनि/श्रीमती गायत्री जाधव यांनी पंचासमक्ष तलाठी धनराज राठोड व योगेश यांना स्वतःची ओळख सांगुन त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अनुक्रमे 1) धनराज नुरसिंग राठोड, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी, तलाठी, सजा - चिखली, ता. संगमनेर, जि. अहमदनगर, राह. शेळके हॉस्पिटलच्या बाजुला, इंदिरानगर गल्ली नं. 2, संगमनेर, जि. अहमदनगर व 2) योगेश विठ्ठल काषिद, वय - 33 वर्षे, व्यवसाय - टायपिंग, राह. घुलेवाडी फाटा, मु.पो. घुलेवाडी, ता. संगमनेर, जि. अहमदनगर असे असल्याचे सांगितले. योगेश काशिद यांनी स्विकारून ठेवलेली लाचेची रक्कम पंच श्री. विशाल गरूड यांनी टेबलच्या कप्प्यातुन काढल्यानंतर पाहिल्या असता त्यात 2000 रूपये दराची 01 व 500 रूपये दराच्या 68 चलीन नोटा मिळुन आल्या. त्यानंतर सदर नोटांची पंच श्री. विशाल गरूड यांचेमार्फत खात्री केली असता सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे नंबर व हस्तगत करण्यात आलेली रक्कम ही तंतोतंत जुळुन आली. सदर वेळी पोनि/गायत्री जाधव यांनी लाचेची रक्कम पॅक केलेला कागद व माझे वडील श्री. रंगनाथ पवार व इतर यांनी मंगळापुर येथे खरेदी केलेल्या बिगरषेती क्षेत्राशी संबंधीत असलेले कागदपत्र योगेश याने हजर केल्याने त्यांच्या छायांकीत प्रती काढुन त्यावर पोनि/श्रीमती गायत्री जाधव व पंचांनी सहया करून ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर येथे आल्यानंतर पोनि/श्रीमती गायत्री जाधव यांनी सदर कारवाईबाबत सविस्तर सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाई पंचनामा केलेला आहे.

तरी माझे वडील श्री. रंगनाथ गवाजी पवार व इतर 11 यांनी मंगळापुर येथे खरेदी केलेल्या बिगरशेती क्षेत्राचा स्वतंत्र 7/12 उतारा तयार करून देण्याच्या मोबदल्यात तलाठी श्री. धनराज राठोड यांनी दिनांक 21/04/2023 रोजी पंच साक्षीदार यांचे समक्ष 45,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 36,000/- रूपये लाचेची मागणी केली.

(टिप -सीसीटीएनएस प्रणाली मध्ये कमाल 8000 अक्षरांची मर्यादा असल्याने यासोबत फिर्यादी यांची संपुर्ण फिर्याद जोडण्यात आली आहे .)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

BHAGWAN HARIBHAU MATHURE(I (Inspector)) / BCMH79922 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Pawar R.R

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
[illegible] पोलीस स्टेशन
जि. अहमदनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): BHAGWAN HARIBHA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH79922